आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
११ जुलै २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत आणि न्यूझीलंड येत्या ४ वर्षात द्विपक्षीय व्यापार ३५ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवणार

- भविष्याची गरज पूर्ण करण्यासाठी आवश्यक परिवहन प्रणालीच्या निर्मितीसाठी ब्रिक्स देशांमध्ये सहमती गरजेची असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं मत

- राज्यात सुमारे ४५ टक्के क्षेत्रावर पेरण्या पूर्ण, अमरावती विभाग आघाडीवर

आणि

- भारतीय संघ वाहतूक कोंडीत अडकल्यानं इंग्लंड विरुद्धच्या टी-२० मालिकेतल्या शेवटच्या सामन्यात नाणेफेक विलंबाने

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंडने २०३० पर्यंत द्विपक्षीय व्यापार ३५ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याचा निर्धार केला आहे. तसंच दोन्ही देशांमधले द्विपक्षीय संबंध धोरणात्मक भागीदारीच्या पातळीवर नेण्याचं ठरवलं आहे असं, परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव रुद्रेंद्र टंडन यांनी सांगितलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झॉन यांच्यात ऑकलंडमध्ये झालेल्या चर्चेची माहिती त्यांनी वार्ताहरांना दिली. भारत आणि न्यूझीलंड दरम्यान आज संरक्षण, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय, पर्यटन, क्रीडा आणि आपत्ती व्यवस्थापन या क्षेत्रांशी संबंधित पाच महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आले.

यानंतर प्रधानमंत्र्यांनी न्यूझीलंडमधल्या भारतीय समुदायाशी संवाद साधला. न्यूझीलंडमधला भारतीय समुदाय हा दोन्ही देशांमधल्या भागीदारीचा एक अत्यंत महत्त्वाचा आधारस्तंभ आहे, असं प्रतिपादन त्यांनी आपल्या संबोधनात केलं. दोन्ही देशांसमोर संधींचा अथांग महासागर असून ही भागीदारी अधिक उंचीवर नेण्यासाठी दोन्ही देश सज्ज असल्याचं मोदी म्हणाले. भारत आणि न्यूझीलंड संबंधांविषयी मोदी म्हणाले…

**होल्ड… बाईट - प्रधानमंत्री**

यावेळी न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झॉन म्हणाले की, मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी झाल्यामुळे न्यूझीलंडच्या निर्यातदारांसाठी १ अब्ज ४० कोटी लोकांची बाजारपेठ

खुली झाली आहे. तसंच न्यूझीलंडमधल्या भारतीय व्यवसायांसाठीही नवीन संधी निर्माण झाल्याचं लक्झॉन म्हणाले.

या भेटीनंतर आपला न्यूझीलंड दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी भारतात परतण्यासाठी रवाना झाले.

<><><><><>

शाश्वत, लवचीक आणि भविष्यवेधी परिवहन प्रणालींच्या निर्माणासाठी ब्रिक्स देशांमध्ये दृढ सहकार्याची गरज असल्याचं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी नागपुरात केलं. भारताच्या अध्यक्षतेखाली ब्रिक्स देशांच्या परिवहन मंत्र्यांच्या तिसऱ्या बैठकीचं उद्घाटन गडकरी यांच्या हस्ते झालं. त्यावेळी ते बोलत होते. ही बैठक नव्या अर्थव्यवस्थांमध्ये परिवहन क्षेत्र मजबूत करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचंही ते म्हणाले. 'लवचिकता, नाविन्य, सहकार्य आणि शाश्वतता यासाठी उभारणी' अशी या बैठकीची संकल्पना आहे.

परिवहन देशाच्या आर्थिक विकासाचा कणा आहे असं सांगत रस्ते, रेल्वे, सागरी आणि हवाई वाहतूक क्षेत्रांमध्ये भारताच्या विकासाविषयी त्यांनी माहिती दिली. या बैठकीची सांगता उद्या होणार आहे.

<><><><><>

राज्यात मान्सूनने जोर धरल्याने खरीप हंगामातल्या पेरणीच्या कामांना वेग आला आहे. कृषी आयुक्तालयाच्या ७ जुलैच्या अहवालानुसार, राज्यातल्या ६५ लाख ११ हजार ८७२ हेक्टर, म्हणजेच ४५ टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. ऊसाची लागवड लक्षात घेतली तर एकूण ६५ लाख ८२ हजार ६२३ हेक्टर क्षेत्रावर पेरणी आणि लागवड झाली आहे.

अमरावती विभागात सर्वाधिक ५८ टक्के पेरणी झाली असून, त्यापाठोपाठ छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक विभागात प्रत्येकी ५० टक्के, लातूर विभागात ४४ टक्के, नागपूर विभागात ३९ टक्के, पुणे विभागात २२ टक्के, कोल्हापूर विभागात १५ टक्के, तर कोकण विभागात केवळ ४ टक्के पेरणी झाली आहे. उशिरा सुरू झालेल्या पावसामुळे कोकणात पेरणीला विलंब झाला असला, तरी अलीकडे झालेल्या पावसामुळे आता या कामांना गती मिळत आहे.

तेलबियांची ६० टक्के, कापसाची ४९ टक्के, कडधान्यांची ३७ टक्के आणि तृणधान्यांची ३० टक्के पेरणी झाली आहे. कापूस आणि सोयाबीन ही पिके सर्वाधिक क्षेत्रावर असून, भात, नाचणी, मका, तूर, मूग आणि उडीद पिकांच्या पेरणीलाही वेग आला आहे. पेरणी झालेली बहुतांश पिके उगवण ते रोपवाढीच्या अवस्थेत असून, काही भागांत भाताची पुनर्लागवड सुरू आहे.

गेल्या आठवड्यात राज्यभर झालेल्या पावसामुळे रखडलेल्या पेरण्यांना चालना मिळाली असून, पुढील काही दिवसांत पेरणीचे प्रमाण आणखी वाढण्याची अपेक्षा कृषी विभागाने व्यक्त केली आहे.

<><><><><>

आषाढी वारीसाठी पंढरपूरकडं निघालेल्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालख्या पुण्यातील मुक्काम संपवून आज सकाळी पुढे मार्गस्थ झाल्या. हडपसर इथं पालख्यांचं मोठ्या जल्लोषात आणि भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आलं. तुकाराम महाराजांच्या पालखीचा मुक्काम आज हडपसर मध्येच असून ज्ञानेश्वर महाराजांची पालखी वडकिमार्गे आज दिवेघाटातून सासवड मुक्कामी पोहोचणार आहे.

<><><><><>

राज्यात झालेला एमपीएससी नोकर भरतीचा घोटाळा हा मध्य प्रदेशात झालेल्या व्यापम नोकर भरती घोटाळ्यापेक्षा मोठा असल्याची टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. या प्रकरणी गेल्या तीन दिवसांपासून बेलापूर इथे काँग्रेसने सुरू केलेल्या ठिय्या आंदोलन आणि बेमुदत साखळी उपोषणाला आज सपकाळ यांनी भेट दिली, त्यावेळी ते बोलत होते. एमपीएससी प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने लक्ष घालून ऑनलाईन परीक्षा रद्द करावी अन्यथा राज्यव्यापी आंदोलन करू, असा इशाराही सपकाळ यांनी यावेळी दिला.

<><><><><>

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणानं स्वीगी इन्स्टामार्ट या कंपनीला नऊ नोटिसा बजावल्या. ग्राहकांना खराब झालेले आणि मुदत संपलेले अन्नपदार्थ पुरवल्याच्या तक्रारीसह अनेक तक्रारी ग्राहकांनी केल्या होत्या. त्यानंतर ही कारवाई करण्यात आल्याची

माहिती प्राधिकरणानं समाजमाध्यमांद्वारे दिली. प्राधिकरणानं कंपनीकडून सविस्तर स्पष्टीकरण मागवलं आहे.

<><><><><>

मनी लाँड्रिंग प्रकरणात ईडी, अर्थात सक्तवसुली संचालनालयने रिलायन्स अनिल अंबानी ग्रुपची  १ हजार २१ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्याचा नवीन आदेश जारी केला आहे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरकडे असलेले रिलायन्स पॉवरच्या मालकिचे समभाग तसंच सासन पॉवर आणि रिलायन्स पॉवरकडून आलेली काही कर्जाची रक्कम जप्त करण्यात आली आहे, असं ईडी ने आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

सांगली जिल्ह्यात मिरज तालुक्यातल्या बेळंकी इथं नव्याने ३० खाटांचं अत्याधुनिक ग्रामीण रुग्णालय उभारण्यात आल्यामुळे, परिसरातल्या नागरिकांना दर्जेदार आणि आधुनिक आरोग्य सेवा, स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहेत, अशी माहिती राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिली. रुग्णालयाच्या लोकार्पणप्रसंगी त्या बोलत होत्या.

<><><><><>

धुळे जिल्ह्यातल्या कुडाशी गावात रेशन दुकानातून गव्हाची पोती चोरणाऱ्या ४ आरोपींना पोलिसांनी अवघ्या काही तासात अटक केली. आरोपींकडून दोन मोटारसायकलसह १ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, न्यायालयानं संशयितांना पोलीस कोठडी सुनावली आहे.

<><><><><>

हिंगोली जिल्ह्याला आज पुन्हा एकदा भूकंपाचा धक्का जाणवला. या भूकंपाची तीव्रता ३ पूर्णांक ५ रिश्टर स्केल एवढी होती तर केंद्रबिंदू औंढा नागनाथ तालुक्यातल्या वसई इथं होता. भूकंपामुळे कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झालेली नाही.

<><><><><>

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेतला पाचवा आणि अंतिम सामन्यातली नाणेफेक उशिरा होणार आहे. हा सामना आज साउथहॅम्प्टन इथल्या 'युटिलिटा बाउल' स्टेडिअमवर खेळवला जाणार आहे. ७ वाजता हा सामना सुरू होणार होता.

पण भारतीय संघ वाहतूक कोंडीत अडकल्यानं ही नाणेफेक उशिरा होणार आहे. इंग्लंडने ३-० अशी आघाडी घेत आधीच मालिका  जिंकली आहे.

<><><><><>

गेल्या २४ तासात कोकणात काही ठिकाणी तर विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकणात अनेक ठिकाणी, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

<><><><><>

लंडन मधल्या लॉर्ड्स इथं सुरू असलेल्या महिलांच्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात काल भारतीय महिलांनी सर्व बाद २८५ धावा केल्या. भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरनं ५८, स्मृती मंधानानं ८३ आणि दिप्ती शर्माने ५७ धावा केल्या. इंग्लंडच्या सोफी एक्लेस्टोनने ६८ धावांत ३ खेळाडू बाद केले. दुसऱ्या दिवसअखेर इंग्लंडचा संघ ८ फलंदाज गमावून १५९ धावांवर खेळतो आहे. भारताच्या क्रांती गौड हिनं ३२ धावांच्या मोबदल्यात चौघींना बाद केलं.

//<><><><><>//